# पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या पूलवरील शासकीय निवासस्थाने वाटपाबाबतची मार्गदर्शक तत्त्वे / धोरण

महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत मलबार हिल, मुंबई येथे पोलीस महानिरीक्षक व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी २४ निवासस्थानांचे बांधकाम पायाभूत सुविधांसह करण्यात आले आहे. **सदरहू निवासस्थाने पोलीस महासंचालकांच्या पूलवरील चिन्हांकीत निवासस्थाने असून त्या** निवासस्थानांचे वाटप करण्याचे अधिकार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहेत. त्याबाबत पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात आले आहे :-

| अ. क्र. | शासकीय इमारतीचे नांव | सदनिका | सदनिकेचे क्रमांक | |
|---|---|---|---|---|
| १ | **"निलीमा" इमारत**<br>(२१५०.०६ चौ.फुट)<br>(पोलीस महानिरीक्षक व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी) | २४ सदनिका | ३-ए / ४-ए / ५-ए / ६-ए / ७-ए / ९-ए / १०-ए / ११-ए / १२-ए / १३-ए / १४-ए / १५-ए | ३-बी / ४-बी / ५-बी / ६-बी / ७-बी / ९-बी / १०-बी / ११-बी / १२-बी / १३-बी / १४-बी / १५-बी |

१. शासकीय निवासस्थान वाटपासाठी कार्यालयात अर्ज प्राप्त झालेल्या तारखेनुसार **प्रतिक्षा यादी** तयार करण्यात यईल.

२. शासकीय निवासस्थानाचे वाटपासाठी खालील निकष लावण्यात येतील :-

**(१) प्रतिक्षा यादीवरील जे अधिकारी त्यांच्या वेतनश्रेणीनुसार (Pay Scale) ज्येष्ठ असतील त्या ज्येष्ठतेनुसार निवासस्थानाचे वाटप करण्यात येईल.**

**(२) प्रतिक्षायादीवर एकच वेतनश्रेणी असलेले एकापेक्षा जास्त अधिकारी असतील, तर त्या अधिकाऱ्यांचे अर्ज कार्यालयात प्राप्त झालेल्या तारखेच्या ज्येष्ठतेनुसार त्यांना निवासस्थान वाटप करण्यात येईल.**

३. शासकीय निवासस्थानांचे वाटप करतांना, प्रतिक्षा यादीमधील पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात नियुक्तीस असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

४. एकदा निवासस्थान वाटप केल्यानंतर ते जर स्विकारले नाही, तर सदर अर्ज रद्द होईल. त्यानंतर तीन महिन्यापर्यंत पुन्हा अर्ज करता येणार नाही. दुसरे निवासस्थान हवे असल्यास, त्यासाठी पुन्हा नव्याने अर्ज करणे आवश्यक राहील, व सदर अर्ज पुन्हा नव्याने प्रतिक्षा यादीवर घेण्यात येईल.

५. वैद्यकीय कारणास्तव विशेष बाब म्हणून शासकीय निवासस्थान वाटपाची बाब पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्णयाधीन असेल. अर्जदारास स्वत:ला गंभीर आजार असल्यास, **व त्यांना अन्य शासकीय निवासस्थान वाटप केले नसल्यास,** निवासस्थान प्राधान्याने वाटप करण्यात येईल. त्याकरीता अर्जदाराने संबधीत कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. तथापि त्यांचे आई वडिल तसेच इतर नातेवाईकांचा विशेष बाब म्हणुन वैद्यकीय कारणास्तव शासकीय निवासस्थान वाटप करण्यासाठी विचार केला जाणार नाही.

६. पोलीस अधिकारी हे सेवानिवृत्त/दिवगंत झाल्यानंतर प्रचलित शासन निर्णयामधील तरतुदींनुसार फक्त **तीन महिने** शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवता येईल. त्यानंतर प्रचलित शासन निर्णयामधील तरतुदींनुसार दंडनीय शुल्क आकारण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. **तसेच, सेवानिवृत्तीच्या एका वर्षानंतरही निवासस्थानाचा ताबा न सोडल्यास संबंधीत अधिकाऱ्यांच्या ताब्यातील निवासस्थान निष्कासीत करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल.**

७. "निलीमा" इमारतीमध्ये राहणाऱ्या अधिकाऱ्यांची सर्वसाधारण बदल्यांमध्ये आंतर जिल्हा बदली झाल्यानंतर अशा अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी वाटप केलेले निवासस्थान ताब्यात घेतल्यापासून **दोन आठवड्यांच्या आत "निलीमा" इमारतीमधील निवासस्थान** रिक्त करावे. सदरचा कालावधी ३ महिन्यांपेक्षा जास्त असता कामा नये. "निलीमा" इमारतीमधील निवासस्थान मिळण्याकरिता प्रतीक्षायादीवर असलेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना सदर निवासस्थानाचे वाटप शक्य तितक्या लवकर करण्याच्या हेतूने सदर नियमाची तरतूद करण्यात येत आहे. तसेच मुंबईबाहेरुन बदली होऊन आलेल्या व "निलीमा" इमारतीमधील निवासस्थान वाटप झालेल्या अधिकाऱ्यांनी त्यांचे पुर्वीचे शासकीय निवासस्थान दोन आठवड्यांच्या आत रिक्त करावे. दोन्ही निवासस्थाने ताब्यात ठेवल्यास संबधीत अधिकाऱ्यांकडून प्रचलित शासन निर्णयामधील तरतुदींनुसार दंडनीय शुल्क आकारण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

८. वाटप करण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानात संबधीत व्यक्ती राहत नसल्यास / दुसऱ्या कोणास राहण्यास दिल्यास त्या दोघांवर ही फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येवून शिस्तभंगाची कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

९. बृहन्मुंबईबाहेर ठाणे / नवी मुंबई येथे बदली झालेल्या अधिकाऱ्यांना 'निलीमा' इमारतीतील शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवण्यास अनुमती देण्याबाबत प्रकरणपरत्वे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई निर्णय घेतील. **परंतु त्यांना २ शासकीय निवासस्थाने ताब्यात ठेवता येणार नाहीत.**

१०. सदरच्या नियमांत बदल करण्याचे संपुर्ण अधिकार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना असतील.

२२।४।१७

(डॉ. प्रज्ञा सरवदे)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.